महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १४

# महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड

सुरक्षा घोंगडे



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १४

# महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड

सुरक्षा घोंगडे

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराणी चिमणाबाई
सयाजीराव गायकवाड
इतिहास
सुरक्षा घोंगडे
●
प्रकाशन क्रमांक - ३४
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : सुरक्षा घोंगडे,
सकटे गल्ली, मोहरे,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
४१६११४
मो. ७५०७३९९०७२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोघे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३० रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.


**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**


●●●



# महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड

एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि विसाव्या शतकाचा पूर्वार्ध अशा जवळजवळ शतकाचा कालखंड हा स्त्री सुधारणा आणि स्त्री संघटन या दोन्ही दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. प्राचीन काळापासून स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते, पण १९ व्या शतकात स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता करून उन्नती घडवून आणण्याविषयी जागृती झाल्याचे दिसते. १८४८ मध्ये पुण्यात भिडे वाड्यात महात्मा फुले आणि सावित्रीबाईंनी स्त्रियांची पहिली शाळा सुरू करून स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली. १९ व्या शतकात १८५० नंतरच्या उत्तरार्धात शिक्षणाच्या बरोबरीने स्त्रियांना सामाजिक, सांस्कृतिक जीवनात सहभागी करून घेण्याची तत्कालीन समाजसुधारकांची विलक्षण धडपड होती. स्त्रियांसंदर्भात सामाजिक काम करणाऱ्या स्त्रियांची पहिली पिढी यातून पुढे आली. सावित्रीबाईंनी यादृष्टीने पहिले पाऊल टाकले. महात्मा फुले यांच्या मार्गदर्शनाखाली सावित्रीबाईंनी

महिला सेवा मंडळाची स्थापना केली. त्या अंतर्गत त्यांनी स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. एकूणच ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात आधुनिकीकरणाची प्रबोधन परंपरा निर्माण झाली. या परंपरेत भारतीय मानदंड निर्माण करणारे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी स्त्रीशिक्षण आणि स्त्री सक्षमीकरण या क्षेत्रात नवा मानदंड निर्माण केला. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या प्रेरणेने पुढे महाराणी चिमणाबाई यांनी स्त्रीउद्धाराचे कार्य हाती घेतले. मुलींसाठी प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या चिमणाबाईंनी बालविवाहाची प्रथा बंद करण्याची मागणी केली होती.

भारतातील बहुतांश राजघराण्यातील स्त्रियांचे आयुष्य राजवाड्यापुरतेच मर्यादित राहिले आहे. या बाबीला बडोदा संस्थान अपवाद होते. कारण सयाजीरावांनी आपल्या पत्नीला देशी शिक्षिकांबरोबरच विदेशी शिक्षिकांकडूनही शिक्षण दिले. १८८७ च्या पहिल्या परदेश वारीपासून सर्व २६ परदेश दौऱ्यात चिमणाबाईंना आपल्यासोबत ठेवले. परदेशवारी करणाऱ्या चिमणाबाई या भारतीय राजघराण्यातील बहुधा पहिल्या महिला असतील. या सगळ्याचा परिणाम म्हणून चिमणाबाई एक स्वतंत्र दृष्टी असणारे त्याचप्रमाणे बौद्धिकदृष्ट्या पूर्ण विकसित व्यक्तिमत्त्व म्हणून पुढे आल्या.

## विवाह, शिक्षण आणि वैचारिक जडणघडण

सयाजीराव महाराजांच्या पहिल्या पत्नी महाराणी चिमणाबाईंचा ७ मे १८८५ रोजी मृत्यू झाला. त्यामुळे इंदोरजवळील देवास येथील बाजीराव अमृतराव ऊर्फ मामासाहेब घाडगे यांच्या पाचव्या कन्या गजराबाई यांच्याशी महाराजांचा दुसरा विवाह ठरला. गजराबाईंचा जन्म परंपरावादी कुटुंबात १६ नोव्हेंबर १८७१ रोजी झाला. वयाच्या १४ व्या वर्षी गजराबाईंचा (दुसऱ्या महाराणी चिमणाबाई) महाराजांशी २८ डिसेंबर १८८५ रोजी विवाह झाला. या महाराणीचे आधीचे नाव बदलून 'चिमणाबाई दुसऱ्या' असे नामकरण करण्यात आले. लग्नावेळी निरक्षर असणाऱ्या चिमणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वामध्ये अमूलाग्र बदल घडवून आणण्यात महाराजांचा सर्वाधिक वाटा होता. विवाहानंतर चिमणाबाईंनी घेतलेल्या शिक्षणामागे सयाजीराव महाराजांची प्रेरणा होती. परंपरावादी कुटुंबात वाढलेल्या चिमणाबाई विवाहानंतर आधुनिक जीवनप्रणालीचा स्वीकार करण्यास सुरुवातीला तयार नव्हत्या. परंतु महाराजांमुळे शक्य झालेले युरोपियन देशांचे दौरे व पाश्चात्य राजघराण्यातील जोडप्यांशी झालेले वैचारिक आदान-प्रदानामुळे चिमणाबाईंना स्त्रीशिक्षणाचे महत्त्व पटले.

१८८१ साली महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. तेव्हाच आपल्या राज्याचे सुधारलेल्या आणि पुढारलेल्या राज्यात परिवर्तन करण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ केला. स्त्री शिक्षणाला आरंभ

केला. सयाजीरावांनी महाराणींनाही शिक्षण देण्याचा निश्चय केला. सुरुवातीला महाराणींना शिकवण्यासाठी सगुणाबाई देव, नंदाबाई पितळे या दोन शिक्षिका होत्या. परंतु महाराणींच्या शिक्षणात फारशी प्रगती होत नसल्याने महाराजांनी १८९६ साली Miss Vivaseur या युरोपियन शिक्षिकेची प्रथम नियुक्ती केली. तेव्हापासून काही युरोपियन शिक्षिका महाराणींजवळ नोकरीत होत्या. मिस सोराबजी, मिस मिड,मिस जेफर्येस, मिस मॅक्कीन, मिस टोटनहॅम या शिक्षिका आणि सोबतकार महाराजांनी चिमणाबाईंना उपलब्ध करून दिल्या. परिणामी महाराणींच्या व्यक्तिमत्त्वात अपेक्षित बदल घडून आले. महाराणी चिमणाबाई अतिशय जिद्दी आणि कष्टाळू विद्यार्थिनी होत्या. त्यामुळे त्या अल्पावधीतच मराठी, संस्कृत, इंग्रजी व गुजराती शिकल्या. त्यांनी युरोपातील अनेक चांगल्या चालीरीतींचे अनुकरण केले. युरोपियन शिक्षिकेच्या प्रयत्नाने व स्वतःच्या इच्छाशक्तीने त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वात क्रांतिकारक बदल घडवून आणला.

## आरोग्य आणि क्रीडा

स्त्रियांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी आपल्या शारीरिक विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे याबाबत महाराजांप्रमाणेच त्या आग्रही होत्या. स्वतःच्या शारीरिक तंदुरुस्तीसाठी चिमणाबाई रोज ७५ मिनिटे चालण्याबरोबरच घोडेस्वारीसुद्धा करत. टेबल टेनिसची आवड असल्याने चिमणाबाई रोज संध्याकाळी टेनिसचे ४ सेट खेळत. चिमणाबाईंबरोबर टेनिस खेळताना बडोदा

लष्करात जनरलपदी कार्यरत असणाऱ्या नानासाहेब शिंदेंची दमछाक होत असे. यावरून चिमणाबाईंच्या टेनिस खेळातील कौशल्य व शारीरिक क्षमता यांची आपल्याला प्रचिती येते. महाराजांबरोबर अनेक शिकारी दौऱ्यात उत्साहाने सहभागी होणाऱ्या चिमणाबाईंनी स्वतंत्रपणे वाघ, चित्ता यांसारख्या जंगली जनावरांची सुद्धा शिकार केली होती.

## दातृत्व

नवनवीन बाबी शिकण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती असणाऱ्या चिमणाबाईंनी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानातील अनेक कल्याणकारी योजनांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला. महाराजांच्या प्रेरणेने विवाहानंतर शिक्षण घेतलेल्या चिमणाबाईंनी स्त्रीशिक्षण प्रसाराचे कार्य करणाऱ्या विविध संस्थांना वेळोवेळी उदारहस्ते आर्थिक साहाय्य केले. मुलींच्या शिक्षणासाठी चिमणाबाईंनी स्वतःच्या खानगी खर्चातून दरमहा २०० रु. ची तरतूद केली होती. त्याचप्रमाणे बॉम्बे कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलींना शिष्यवृत्ती देण्यासाठी महाराणी चिमणाबाईंनी स्वतंत्रपणे १,००,००० रुपयांची रक्कम ठेव म्हणून ठेवली होती. ही रक्कम आजच्या रुपयात २३ कोटी ८९ लाखांहून अधिक भरते. महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळेस चिमणाबाईंकडून ६,००० रु. वार्षिक अनुदानाची तरतूद करण्यात आली होती. ही रक्कम आजच्या रुपयात १ कोटी ४३ लाखांहून अधिक भरते.

## पडदा पद्धत

परदेश प्रवासावेळी महाराज आपल्यासोबत चिमणाबाईंनाही घेऊन जात. परदेश प्रवास करताना महाराणी चिमणाबाई पडदा पद्धतीचा अवलंब करत नव्हत्या. पाश्चिमात्य स्त्री इतक्याच मोकळेपणाने त्या परदेशात वावरत. स्त्रियांबद्दलच्या पारंपरिक धारणा आणि कल्पना दृढमूल असणाऱ्या काळात महाराणी चिमणाबाईंनी पडदा पद्धतीचा त्याग केला. १९१४ पासून भारतातही चिमणाबाईंनी पडदा पद्धतीचा त्याग केला. पडदा पद्धतीचा त्याग करणाऱ्या राजघराण्यातील चिमणाबाई या पहिल्या महिला होत्या.

## संस्थात्मक कार्य

महाराजांबरोबर वेळोवेळी भारताबरोबरच युरोप, अमेरिकेसारख्या पाश्चात्य आणि जपानसारख्या पौर्वात्य देशांमध्ये केलेल्या प्रवासात महाराणी चिमणाबाईंना पाश्चात्य स्त्रियांनी उभारलेल्या संस्थांचे अवलोकन करता आले. भारतीय स्त्रियांच्या उन्नतीसाठी स्त्रियांना शिक्षण देतानाच त्यांच्या कौशल्यांना वाव देणाऱ्या विविध संस्थांची उभारणी करणे आवश्यक असल्याचे चिमणाबाईंचे मत होते. परदेशातील चांगल्या गोष्टींचे अनुकरण करत असतानाच महाराजा सयाजीरावांनी बडोद्यात उभारलेल्या विविध संस्था आणि राबवलेल्या योजनांचा आदर्शही चिमणाबाईंसमोर होता. या आदर्शाचे अनुकरण करत महाराणी चिमणाबाईंनी अनेक संस्था निर्माण करून स्त्रीउद्धाराच्या कार्याला गती दिली.

## महाराणी चिमणाबाई लेडीज क्लब (१९०३)

स्त्रियांचा सामाजिक संपर्क वाढावा यासाठी ३ मार्च १९०३ रोजी 'चिमणाबाई लेडीज क्लब'ची स्थापना करण्यात आली. भारतीय महिलेने स्थापन केलेला भारतातील हा बहुधा पहिला क्लब होता. फेब्रुवारी १९२६ मध्ये लेडीज क्लबने संगीत व नाट्य या कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या क्लबच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील बुद्धिमान स्त्रियांमध्ये होणारा परस्पर संवाद हा बडोद्यातील स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीचा महत्त्वाचा टप्पा होता.

## श्री चिमणाबाई स्त्री उद्योगालय (१९१७)

स्त्रियांना स्वावलंबी करून त्यांचा व्यावसायिक दृष्टिकोन व्यापक करण्यासाठी १९१७ मध्ये 'स्त्री उद्योगालया'ची स्थापना करण्यात आली. या उद्योगालयाने महिलांविषयीचे विविध उद्योग आणि तांत्रिक शिक्षणाच्या विविध अभ्यासक्रमाची सोय करून दिली. स्त्री उद्योगालयाने भारतातील स्त्रियांचा पहिला आनंदमेळा भरविला होता. महिलांना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देणाऱ्या गुजरातमधील या पहिल्या केंद्रात शिवणकाम, भरतकाम, विणकाम, लेस तयार करणे असे कौशल्याधारित प्रशिक्षण दिले जात असे. तसेच मसाले, मुरांबे, लोणची, फराळाचे पदार्थ स्त्रियांकडून तयार करून घेतले जात होते.

१९३८ मध्ये स्त्री उद्योगालयाच्या इमारतीसाठी सर सयाजीराव डायमंड ज्युबिली फंडातून ३०,००० रुपये देणगी देण्यात आली. ही रक्कम आजच्या रुपयात ४ कोटी ४९ लाखांहून अधिक भरते. १९३९ मध्ये स्त्री उद्योगालयाने डिप्लोमा परीक्षेसाठी येणाऱ्या खेड्यातील स्त्रियांसाठी वसतिगृहाची सोय केली. दरवर्षी जवळजवळ २०० स्त्रिया या उद्योगालयात प्रवेश घेत असत. ज्या स्त्रियांनी घरगुती उद्योग व व्यवसाय सुरू केले होते, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांनी तयार केलेल्या विविध वस्तू जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराजांनी अशा वस्तूंच्या प्रदर्शनांचे आयोजनही केले होते. समाजाला प्रगतीकडे घेऊन जाण्याचे क्रांतिकारक धोरण राबवताना सयाजीरावांचे पारंपरिक मानसिकतेवर थेट हल्ला न करता हळूहळू समाजाला या पारंपरिक मानसिकतेतून बाहेर काढण्याचे कौशल्य चकित करणारे होते. स्त्रियांना उद्योगात आणताना त्यांच्यावरील पारंपरिक धार्मिक प्रवाहाचा विचार करून सयाजीरावांनी हिंदू स्त्रियांसाठी 'बटर' व 'तूप' तर मुस्लिम महिलांसाठी 'कुक्कुटपालन' यासारख्या व्यवसाय उद्योगांना पाठबळ दिले.

## महाराणी चिमणाबाई स्त्री समाज (१९१५)

मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्रियांचा दृष्टिकोन व्यापक व्हावा, त्यांचा सामाजिक अवकाश विस्तारून त्यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची जडणघडण व्हावी या उद्देशाने २० फेब्रुवारी १९१५ ला 'श्री महाराणी चिमणाबाई स्त्री समाजा'ची स्थापना करण्यात

आली. या संस्थेतर्फे नर्सिंग, प्राथमिक उपचार, शिवणकाम, भरतकाम, चित्रकला, टंकलेखन यांचे प्रशिक्षण दिले जात असे.

## कन्या आरोग्य मंदिर (१९१५)

१९१५ साली श्री. मनोरमा दिघे यांच्या प्रेरणेतून जुम्मादादा व्यायाम मंदिरात या संस्थेची स्थापना झाली. मनोरमा दिघे यांनी खास स्त्रियांसाठी असलेले शारीरिक शिक्षणाचे परीक्षण त्यांचे पती शंकरराव दिघे यांच्याकडून घेतले. मुलींचे आरोग्य चांगले राहावे, स्वतःचे स्वंरक्षण करण्याबाबत त्या सक्षम असल्या पाहिजेत. त्या स्वावलंबी असाव्यात या एकमेव ध्येयाने मुलींना शारीरिक शिक्षण देणे आवश्यक आहे. हाच ध्यास घेऊन ही संस्था निर्माण केली होती. यामध्ये मुलींना वेगवेगळे खेळ, कसरतीचे प्रकार, कवायत शिकविली जात असत. विशेष म्हणजे मनोरमा दिघे यांची मुलगी वसुमती ही ३०० मुली असलेल्या या संस्थेची व्यवस्था पाहण्याचे काम करत होती.

## मुलींचे महाराणी हायस्कूल (१९०७)

राज्यातील एक सर्वोत्तम शाळा म्हणून या शाळेचा लौकिक होता. १९२५-२६ साली या शाळेचे स्वतःचे वसतिगृह होते. १९३२-३३ साली या वसतिगृहात ७६ विद्यार्थिनी राहत होत्या. सर्वसामान्य विषयांबरोबर विणकाम, संगीत, चित्रकाम, पाकशास्त्र, गृहशास्त्र, भरतकाम याचबरोबर माळीकाम याही विषयाचा यात अंतर्भाव होता. शास्त्रोक्त पद्धतीने रोपे कशी वाढवावी याचे प्रशिक्षण येथे

दिले जात होते. इस्त्री कशी करावी याचे प्रशिक्षण देण्यासाठी शाळेत धोबी नेमला होता. जे.जे. स्कूल ऑफ आर्टस्, बॉम्बे या संस्थेतील प्रवेश परीक्षेची तयारी येथे करून घेतली जात होती. हे सर्व उपक्रम आजही नावीन्यपूर्ण वाटतात.  यातून सयाजीराव महाराजांच्या व्यापक दूरदृष्टीचा प्रत्यय येतो. या सर्व उपक्रमांचे नेतृत्व महाराणी चिमणाबाई करत होत्या.

## भगिनी समाज (१९२१)

महाराणी हायस्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती झवेरी यांनी ८ एप्रिल १९२१ रोजी भगिनी समाजाची स्थापना केली. महाराणी हायस्कूलच्या जागेत दर शनिवारी स्त्रियांनी एकत्र येऊन बैठका घेण्यास सुरुवात केली. या संस्थेच्या वार्षिक समारंभात कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन, निबंध स्पर्धा, देशी खेळ, गायन स्पर्धा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात असे. श्रीमंत लक्ष्मीबाई मुजूमदार या स्त्रियांकडून मराठी गरब्याचा सराव करून घेत असत व रिकाम्या वेळेत आपल्या रावपुरा येथील मुजूमदार वाड्यातील खासगी तलावात स्वत: स्त्रियांना पोहायला शिकवत. १९२७ साली बडोद्यात जेव्हा पुराने मोठी हानी झाली तेव्हा भगिनी समाजाने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मोठी रक्कम जमा करून पूरग्रस्त गरिबांच्या घरोघरी जाऊन मदत पोहोचवली होती.

## महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळा (१९२३)

१९२३ मध्ये बडोदा कॉलेजच्या एका खोलीत 'महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळे'ची स्थापना करण्यात आली. या संस्थेने तब्बल ४० वर्षे स्त्रियांना देशी भाषेत शिक्षण देण्याचे कार्य केले. या पाठशाळेत तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, मानसशास्त्र, जीवशास्त्र, आरोग्यशास्त्र इ.स्त्रियांना उपयुक्त ठरणारे महत्त्वाचे विषय देशी भाषांतून शिकविले जात होते. पाठशाळेकडून विद्यार्थिनींना G.A. (ग्रॅज्युएट इन आर्ट्स) ही पदवी दिली जात असे. त्याचबरोबर या पाठशाळेत पदव्युत्तर शिक्षणाचीही सोय करण्यात आली होती. विद्यार्थिनी P.A. ही पदवी इंग्लिशमधूनही घेऊ शकत होत्या. या P.A. च्या पदवीला बॉम्बे युनिव्हर्सिटीच्या M.A. या पदवीचा दर्जा होता. महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळेस चिमणाबाईंकडून ६,००० रु. वार्षिक अनुदान दिले जात होते. ही रक्कम आजच्या रुपयात १ कोटी ४३ लाखांहून अधिक भरते.

## महाराणी चिमणाबाई प्रसूतिगृह आणि शिशुकल्याण संस्था (१९२३)

सयाजीरावांच्या दृष्टीने भावी पिढीचे संगोपन करणाऱ्या स्त्रियांचे उत्तम आरोग्य हे निरोगी राष्ट्राचा पाया होता. त्यामुळेच सयाजीरावांनी आपल्या आरोग्यविषयक धोरणात स्त्रियांच्या आरोग्यविषयक सुधारणांना अग्रक्रम दिला होता. स्त्रिया आपल्या आरोग्याच्या समस्या महिला डॉक्टरांना जास्त मोकळेपणाने

सांगू शकतील हे सयाजीरावांना ज्ञात होते. परंतु त्या काळात महिला डॉक्टरांची असणारी उणीव या कार्यात अडथळा ठरत होती. यावर उपाय म्हणून महाराजांनी 'लेडी सुपरिंटेंडेंट' हे पद निर्माण केले. स्टेट जनरल हॉस्पिटलमध्ये या पदासाठी महिना ३०० रु. विद्यावेतन व त्यात वार्षिक १५ रु. ची वाढ निश्चित केली. त्याचबरोबर परिचारिकांच्या नेमणुकादेखील करण्यात आल्या होत्या.

गरीब स्त्रियांना प्रसूतीच्या वेळी मदत करण्याच्या उद्देशाने १९०९ मध्ये आपल्या प्रथम पत्नींच्या स्मरणार्थ महाराजांनी ५०,००० रु. ची भरघोस देणगी दिली. ही देणगी आजच्या रुपयाच्या मूल्यात १२ कोटी ५० लाखांहून अधिक भरते. पुढे १९२३ मध्ये गर्भवती स्त्रियांसाठी 'महाराणी चिमणाबाई प्रसूतिगृह व शिशुकल्याण संस्थेंची स्थापना केली. या संस्थेने गर्भवती स्त्रियांना प्रसूतीसाठी सुईणींचा सल्ला घेण्याऐवजी हॉस्पिटलमध्ये येण्यासाठी उत्तेजन दिले. प्रसूतीनंतर व आजारपणातदेखील बाळाची व्यवस्थित काळजी कशी घ्यावी याविषयीचे प्रशिक्षण स्त्रियांना देण्यात आले. त्यावेळी अजून तीन शिशुसंगोपन केंद्रेही स्थापन करण्यात आली. त्याचबरोबर या संस्थेमार्फत शाळकरी मुलांची नियमित वैद्यकीय तपासणी करण्यात येऊ लागली. संस्थेने आई व मुलांना पैसे, दूध, कपडे आणि किराणा मालाचे वाटप केले. या संस्थेने प्रसूतीदरम्यान स्त्रिया आणि बालकांच्या होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यात लक्षणीय यश मिळविले.

## महिला क्रीडा मंडळ (१९३७)

महिला पाठशाळेच्या पहिल्या मुख्याध्यापिका आणि मध्यमवर्गातील स्त्रिया व स्त्री शिक्षिका यांनी १९३७ मध्ये महिला क्रीडा मंडळाची स्थापना केली. या संस्थेचा उद्देश असा होता की, स्त्रियांनी घरकामात बंदिस्त झालेल्या जीवनक्रमातून थोडा वेळ काढून करमणूक, व्यायाम आणि खेळ यात वेळ व्यतीत करावा. या संस्थेचे ध्येय स्त्रियांना देशी खेळांचे शिक्षण देणे असाही होता. या संस्थेमार्फत विविध स्पर्धा होत असत. या स्पर्धा पंचाशिवाय होत होत्या. कृष्णाबाई खिस्ते यांनी मुंबईतून शारीरिक प्रशिक्षण घेतले होते. त्यांनी पंचांची उणीव भरून काढली व या संस्थेतील अनेक स्त्रियांना पंच होण्याचे प्रशिक्षण दिले.

या संस्थांच्या स्थापनेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत स्त्रियांना स्वतःच्या उन्नतीसाठी विविध क्षेत्रे खुली करून दिली. संस्थेची स्थापना करण्याबरोबरच तिच्या वाढीसाठी आवश्यक सोई-सुविधा काटेकोरपणे पुरवण्याची महाराजांची पद्धत महाराणी चिमणाबाईंनीदेखील अवलंबली. स्त्रीविषयक कार्यासाठी महाराज आणि चिमणाबाई यांनी केलेली ठळक आर्थिक मदत आजच्या रुपयात ४२ कोटी ३१ लाखांहून अधिक भरते.

## स्त्री-पुरुष समानतेसाठी आग्रही

स्त्री-उन्नतीसाठीच्या विविध प्रयत्नांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवणाऱ्या महाराणी चिमणाबाई स्त्री-पुरुष समानतेसाठी विशेष आग्रही होत्या. सैनिकी खात्याच्या 'कवायती फौजे'संदर्भातील

सेक्शन ९५ नियमामध्ये राजघराण्यातील व्यक्ती व इतर सन्माननीय व्यक्तींना त्यांच्या श्रेणीनुसार विविध समारंभांप्रसंगी द्यावयाच्या अंगरक्षकांची संख्या निर्धारित करण्यात आली होती. त्यानुसार महाराणी व युवराज यांना ३२ स्वारांचा मान देण्यात आला होता. परंतु समानतेच्या तत्त्वानुसार विविध समारंभांप्रसंगी महाराजांइतकेच अंगरक्षक आपल्याला मिळावेत अशी मागणी करतानाच चिमणाबाईंनी अंगरक्षकांची ही संख्या कशाच्या आधारावर निश्चित करण्यात आली याचीदेखील माहिती मागवली.

१९०४ मध्ये बडोद्याच्या दिवाणांनी मंजुरी दिलेल्या सैनिकी खात्याच्या टिपणात सर्वप्रथम अंगरक्षकांची ही संख्या निर्धारित करण्यात आली होती. पुढे महाराजांच्या आदेशानुसार प्रकाशित झालेल्या 'कवायती नियमां'त हीच संख्या कायम ठेवण्यात आली. महाराणी चिमणाबाईंची समान अंगरक्षकांची ही मागणी अमान्य करण्यात आली असली तरी यातून चिमणाबाईंचा स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह यातून स्पष्ट होतो. महाराजांच्या मृत्यूनंतर ब्रिटिश सरकारने पत्रात केलेल्या Dowager (विधवा) महाराणी या उल्लेखावर आक्षेप नोंदवत असा उल्लेख न करण्याची विनंती चिमणाबाईंनी केली होती. त्यांची ही मागणी ब्रिटिश सरकारकडून मान्य करण्यात आली.

## ‘ग्रंथमय’ महाराणी

महाराणी चिमणाबाईंमधील एक जिज्ञासू वाचक निर्माण होण्यामागे सयाजीरावांची प्रेरणा होती. महाराजांसोबत केलेल्या जगप्रवासातून त्यांची दृष्टी अधिक विशाल झाली होती. महाराजा सयाजीराव यांचा वाचनाचा व्यासंग खूप मोठा होता. पुढे तोच गुण महाराणींनी घेतला. त्या निरनिराळ्या प्रदेशातील साहित्य वाचू लागल्या. वैचारिक आणि गंभीर वाचन करण्याकडे त्यांचा जास्त कल होता. त्यांनी वाचलेली काही पुस्तके यादृष्टीने विचारात घेता येतील. ‘रेमिनीसनस ऑफ लेडी डोरोथी नेव्हिल’, ‘सर्व्हिस बुक फॉर द वाइफ’, ‘रुलर्स ऑफ इंडिया’, ‘इंडिया अंडर हर्ष’, ‘द ड्युटिज ऑफ मँन’, ‘द लॉस ऑफ मून’ अशा अनेक महत्त्वाच्या ग्रंथांचे वाचन महाराणींनी केले होते. वाचन करत असताना त्या स्त्रीविषयक माहिती मिळवण्यासाठी प्रयत्नशील असत. वाचनाचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर इतका परिणाम झाला होता की त्या बोलताना पुस्तकातील संदर्भ देऊन बोलत असत. महाराजांप्रमाणेच त्यांचेही ग्रंथालय समृद्ध होते.

अनेक विषयावरील आणि भाषांमधील पुस्तके त्यांच्या ग्रंथालयात होती. ‘द ड्युटिज ऑफ मँन’ या पुस्तकाचा खूप प्रभाव चिमणाबाईंवर होता. मॅझिनी या इटालियन देशभक्ताचे हे पुस्तक होते. या पुस्तकाचा चिमणाबाईंवरचा प्रभाव पाहून महाराजांनी हे पुस्तक वाचण्यास घेतले. पुढे असे झाले की, या पुस्तकाची दुसरी प्रत मिळेपर्यंत दोघांनी हे पुस्तक दिवसाचा अर्धा-अर्धा वेळ विभागून वाचले. ही आठवण मिस टोटेनहॅम यांनी त्यांच्या

पुस्तकात सांगितली आहे. तसेच ‘इंडिया अंडर हर्ष’ या युआन चुंग यांच्या पुस्तकाच्या प्रभावामुळे राजा हर्षाची राणी राजश्री ज्याप्रमाणे हर्षाच्या मागे बसून यात्रेकरूंशी चर्चा करत असे त्याप्रमाणे चिमणाबाईसुद्धा महाराजांशी संस्थानातील अनेक विषयांवर चर्चा करत होत्या. महाराणी नेहमी देशातील स्त्रियांच्या सामाजिक स्थितीबाबत विचार करत होत्या. देशातील स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी अभ्यास करण्यास सुरुवात केली. स्त्रियांसंदर्भातील अनेक ग्रंथांचे वाचन त्यांनी केले होते.

## महाराणींचा महाग्रंथ

१९११ मध्ये भारतीय स्त्रियांच्या स्थितीचे जगातील ७ खंडातील २९ देशांमधील स्त्रियांच्या स्थितीशी तुलना करून ‘The Position of Women in Indian Life’ हा ग्रंथ लिहिला आहे. महाराणी चिमणाबाई लिखित हा भारतीय स्त्रियांना अर्पण केलेला ग्रंथ लंडनमधून प्रकाशित झाला होता. हा ग्रंथ म्हणजे सयाजीराव महाराजांच्या प्रेरणेने विकसित झालेल्या चिमणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा परमोच्च बिंदू होता. लंडन मधील फरगॉटन बुक्सने १९१२ मध्ये या ग्रंथाची दुसरी आवृत्ती काढली आहे. फरगॉटन बुक्सचे वैशिष्ट्य म्हणजे ते जगातील ऐतिहासिक आणि दुर्मिळ ग्रंथांचे कोणताही बदल न करता पुनर्मुद्रण करते. चिमणाबाईंच्या या पुस्तकाला फरगॉटन बुक्सने classical reprint series मध्ये निवडले आहे. यावरून या पुस्तकाचा ऐतिहासिक दर्जा लक्षात येतो.

जगातील स्त्रियांच्या स्थितीशी भारतीय स्त्रियांच्या स्थितीची तुलना करून लिहिलेला हा आजअखेरचा एकमेव ग्रंथ आहे. कारण ही तुलना करत असताना १०० संदर्भ ग्रंथांचा वापर केला आहे. त्याचप्रमाणे सर्व खंडातील स्त्रियांच्या दर्जाची प्रत्यक्ष पाहणी करून हा ग्रंथ लिहिला आहे. अशा प्रकारे सर्व जगातील स्त्रियांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांच्या स्थितीची भारतातील स्त्रियांच्या स्थितीशी तुलना या ग्रंथात केली आहे. अशा पद्धतीने जगात कोठेही चिमणाबाईंच्या अगोदर किंवा नंतर आजअखेर एकही ग्रंथ लिहिला गेला नाही. म्हणूनच जागतिक परिप्रेक्ष्यात विचार करता हा ग्रंथ एकमेवाद्वितीय ठरतो. या ग्रंथाचे लेखन चिमणाबाईंनी एस.एम.मित्रा या विद्वानाच्या सहकार्याने केले होते.

सार्वजनिक जीवनातून स्त्रियांना वगळले जाण्याची कारणमीमांसा करतानाच त्यावरील उपाययोजना कशा प्रकारे लागू करता येतील याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न चिमणाबाईंनी या ग्रंथात केला आहे. भारतातील अनेक प्रगतशील योजनांच्या अपयशाचे मुख्य कारण या योजनांमधील स्त्रियांचा अत्यल्प सहभाग हे असल्याचे प्रतिपादन चिमणाबाईंनी केले आहे. आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होऊन कल्याणकारी सामाजिक कार्य करण्याची इच्छा असणाऱ्या स्त्रियांना उपयुक्त अनेक व्यावहारिक सूचना चिमणाबाईंनी या ग्रंथात केल्या आहेत.

पडदा पद्धतीच्या परंपरावादी काळात स्त्रियांनी कृषी, कला, कारागिरी, लोकोपयोगी सेवाकामे, हॉटेल व्यवसाय इ. आर्थिक व्यवसायांशी परिचित होऊन त्यांचा स्वीकार करतानाच बौद्धिक क्षेत्रसुद्धा स्त्रियांनी आपलेसे केले पाहिजे अशी इच्छा या ग्रंथाच्या माध्यमातून त्या व्यक्त करतात. जगातील ७ खंडातील २९ देशांतील स्त्रियांच्या स्थितीशी तुलना करत स्वातंत्र्य प्राप्तीच्या आधी ३७ वर्षे भारतीय स्त्रियांच्या उत्कर्षाचा 'मार्ग' आखून देणाऱ्या या एकमेव ग्रंथाचे नावही स्त्रीप्रश्नांच्या अभ्यासकांना माहीत नाही. ही बाब धक्कादायक तर आहेच परंतु आपल्या चर्चाविश्वाला आत्मपरीक्षण करायला लावणारी आहे.

१८८२ साली ताराबाईंनी 'स्त्रीपुरुषतुलना' हा स्फोटक निबंध लिहून स्त्री शोषणाचा अध्याय लिहिला. त्यानंतर २७ वर्षांनी या ग्रंथाद्वारे चिमणाबाईंनी स्त्रियांच्या आत्मसन्मानाचा महामार्ग आखला होता. आजच्या स्त्रीवादी साहित्याला आत्मचिंतनाकडून आत्मटीकेकडे घेऊन जात असताना पुरुष द्वेषाची बाधा होऊ न देता समतावादी आणि प्रत्येक कालखंडात सुसंगत असा कृतिकार्यक्रम म्हणजे हा महाग्रंथ आहे. हे पुस्तक स्त्रियांसाठी बायबल समान आहे. परंतु दुर्दैवाने स्त्री मुक्ती चळवळीच्या इतिहासाने, इतिहास अभ्यासकांनी आणि महाराष्ट्राने आजअखेर महाराणी चिमणाबाईंची व त्यांच्या या ग्रंथाची दखल घेतली नाही.

## राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय मानसन्मान

सयाजीराव महाराजांच्या ‘वाटेने’ मार्गक्रमण करत स्त्री-उन्नतीसाठी कार्यरत राहिलेल्या महाराणी चिमणाबाईंना ३ ऑगस्ट १८९२ रोजी ब्रिटिश महाराणींनी ‘Emperial Order of the Crown of India’ या किताबाने सन्मानित केले. १९०६ मध्ये कलकत्ता येथील राष्ट्रीय काँग्रेसच्या दुसऱ्या हिंदी औद्योगिक परिषदेतील महिला विभागाच्या अध्यक्षा म्हणून चिमणाबाईंची निवड करण्यात आली होती. याच अधिवेशनाच्या सर्वसाधारण विभागाचे अध्यक्ष सयाजीराव महाराज होते. राजा आणि राणी पती-पत्नींना एकाच वेळी एखाद्या महत्त्वाच्या राष्ट्रीय परिषदेचे अध्यक्षपद सन्मानाने मिळण्याचा भारतातील हा एकमेव प्रसंग असावा.

१९२६ मध्ये त्या 'नॅशनल कौन्सिल फॉर वुमेन इन इंडिया' च्या अध्यक्ष झाल्या. पुढे महाराणींच्या स्वच्छ, स्पष्ट आणि अभ्यासू भूमिकेमुळे १९२७ ला पुण्यात भरलेल्या पहिल्या अखिल भारतीय महिला परिषदेचे अध्यक्षपद त्यांना सन्मानपूर्वक देण्यात आले. ज्या काळात स्त्रियांबद्दलच्या पारंपरिक धारणा आणि कल्पना समाजात दृढमूल झाल्या होत्या त्या काळात महाराणींनी अत्यंत आश्चर्यकारकरीत्या मुलींसाठी प्राथमिक शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला. बालविवाहाची प्रथा नाहीशी करावी याची जोरदार मागणी केली. या परिषदेमध्ये मिसेस कमलादेवी चट्टोपाध्याय यांनी महाराणी चिमणाबाईंच्या प्रगत

दृष्टिकोनाची प्रशंसा करताना म्हटले की, ‘पहिल्या अखिल भारतीय महिला परिषदेच्या अध्यक्षा बडोद्याच्या महाराणी चिमणाबाई गायकवाड या होत्या. त्यांनी आणि महाराजांनी त्यांच्या राज्यात स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला व त्यातही स्त्रियांचे लग्नाचे वय वाढवून यासंबंधी कायदेशीर सुधारणा सर्वात लवकर व वेगाने केल्या. या त्यांच्या कार्यामुळे त्यांची अध्यक्षपदासाठी निवड करण्यात आली. त्यांचे पती महाराजा सयाजीराव हे सुधारणावादी राज्यकर्ते होते आणि महाराणी त्यांना सर्वतोपरी योग्य अशा साथीदार होत्या. पडदा पद्धतीचा त्याग करणाऱ्या राजघराण्यातील पहिल्या महिला होत्या. स्वयंप्रेरणेने जगणाऱ्या महाराणीचे व्यक्तिमत्त्व अतिशय प्रभावशाली आहे.’

१९२९ मध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांचे ‘तौलनिक भाषाशास्त्र’ या विषयावरील भाषण बडोद्यातील सहविचारिणी सभेने आयोजित केले होते. या भाषणाचा वृत्तांत वर्तमानपत्रात वाचून महाराणी चिमणाबाईंनी विठ्ठल रामजी शिंदे यांना चर्चेसाठी बोलावले. यावेळी चिमणाबाईंनी रशियातील कम्युनिझम या विषयावर आपल्याशी चर्चा केल्याचा संदर्भ शिंदे यांनी त्यांच्या ‘माझ्या आठवणी व अनुभव’ या आत्मचरित्रात नोंदवला आहे. ज्या काळात भारतात कम्युनिझम हा विषय नुकताच चर्चेत आला होता त्या काळात एक मराठी राणी कम्युनिझमसारख्या गंभीर विषयांत रुची ठेवते यातच महाराणी चिमणाबाई यांचे बौद्धिक क्षेत्रातील अनन्य स्थान स्पष्ट होते.

महाराणी चिमणाबाई यांच्या उत्तुंग बौद्धिक व्यक्तिमत्त्वाची साक्ष असणारा हा ग्रंथ सर्व भारतीय भाषांमध्ये अनुवादित झाला तर भारतीय स्त्रीला आपली जीवनविषयक भूमिका निश्चित करण्यासाठी तो प्रेरणादायी ठरेल. याबरोबरच जागतिक कर्तृत्व सिद्ध करूनही इतिहासात अदृश्य असणाऱ्या या राणीच्या कर्तृत्वाला भारतीय इतिहासाने न्याय दिला असे होईल. फक्त महाराष्ट्रालाच नव्हे तर भारताला भूषण असणाऱ्या या महान राणीचा मृत्यू २३ ऑगस्ट १९६३ मध्ये झाला.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

# महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Specheess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com